| | |
|---|---|
| MHNG180004192024 | <u>निशाणी क्र. १० वरील आदेश</u> |

१. सदरील अर्जदाराने महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण अधिनियमचे कलम २३ अनुसार हा अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदार क्र. १ चे लग्न गैरअर्जदार क्र. १ सोबत दिनांक ०२.०५.२०१५ रोजी हिंदू रितीरिवाजाप्रमाणे पार पडले. लग्न समारंभ आटोपल्यावर नव–या मुलाचे बुट लपविण्यावरुन व कुलर का लावले नाही या कारणावरुन गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ च्या माहेरच्या नातेवाईकांबरोबर भांडण करुन मारहाण केले व अर्जदार क्र. १ चा भाउ शंकर कुबडे याला संडासामध्ये नेवून मारहाण केली तसेच गावातून नंगा करुन पाठवेन अशी धमकी दिली. लग्नानंतर सुध्दा अर्जदार क्र. १ च्या माहेरी कथेच्या दिवशी गैरअर्जदारांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना चारचाकी कारमध्ये नेवून त्यांचा मानपान केला. अर्जदार क्र. १ गर्भवती असताना गैरअर्जदारांनी तिचे औषधोपचार व्यवस्थित न करता सरकारी दवाखान्यात इलाज केला व मुलगी झाली म्हणून अर्जदाराला बघायला न येता अर्जदार क्र. १ चे सासुसासरे नेहमी त्रास देत होते. बाळंतपणानंतर बाळ दोन महिन्याचे झाल्यावर अर्जदार क्र. १ च्या माहेरच्या लोकांनी तिला रितीरिवाजाप्रमाणे सर्व मानपान करुन सासरी पाठविले. परंतु, डिलेवरीच्या वेळेस कॉपर्टी बसविल्याचे तिला माहिती नव्हते. त्यामुळे सुध्दा अर्जदाराला खुप त्रास झाला. परंतु गैरअर्जदारांनी तिचा औषधोपचार केला नाही.

३. अर्जदार क्र. १ चे पुढे असे कथन आहे की, त्यानंतर मुलगा झाल्यावर आतातरी गैरअर्जदारांचा त्रास कमी होईल असे तिला वाटले. परंतु त्यांचा त्रास कमी झाला नाही. छोटया छोटया गोष्टीवरुन गैरअर्जदार अर्जदार क्र. १ ला मारहाण करायचे. दिनांक ०३.०२.२०२१ रोजी गैरअर्जदार क्र. १ ने साध्या भाताच्या कारणावरुन

अर्जदार क्र. १ ला मारहाण केली व अर्जदार क्र. १ ते ३ यांना घरातून हाकलून दिले. तेव्हापासून अर्जदार हे तिच्या भावाकडे राहतात. ती पूर्णपणे तिच्या माहेरील लोकांवर अवलंबून आहे. तिच्यावर दोन मुलांची जबाबदारी असून तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही.

४. उलटपक्षी, गैरअर्जदार क्र. १ हा एकुलता एक मुलगा असून त्याचे बस स्टँडजवळ सायकलचे दुकान आहे. त्यातून त्याला दरमहा रु. ४०,०००/– इतके उत्पन्न मिळते. तसेच कळमेश्वर येथे गैरअर्जदार क्र. १ च्या नावावर दोन प्लॉट असून त्यातील घर त्याने भाडयावर दिले आहे व त्यातून दरमहा रु. ५,०००/– भाडे येते. गैरअर्जदार क्र. २ व ३ हे शेताच्या कामाला जावून त्योच स्वतःचे पालनपोषण करतात . अर्जदार व तिच्या मुलांच्या व्यतिरिक्त गैरअर्जदार क्र. १ वर कोणाचीही जबाबदारी नाही. करिता अर्जदार क्र. १ ने दरमहा रु. १५,०००/– खावटी मिळण्यासाठी सदर अर्ज केलेला आहे.

५. प्रकरणात गैरअर्जदार हजर झाले. गैरअर्जदारांनी नि.क्र. ११ वर त्यांचे लेखी म्हणणे मांडले. गैरअर्जदार क्र. १ ने त्याचा व अर्जदार क्र. १ चा विवाह व त्यांचे नातेसंबंध मान्य करुन इतर सर्व आरोप फटाळले आहेत. गैरअर्जदारांनी पुढे असे कथन केले आहे की,अर्जदार ही गैरअर्जदारापासून अंदाजे पाच ते सहा महिन्यापासूनच वेगळी राहत असून त्या काळात तिला कुठलाच त्रास नाही. तसेच अर्जदार क्र. १ ने सदरचा अर्ज खोटया पध्दतीने दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ ही शिलाईचे काम करीत असून ती स्वतःचे पालनपोषण करण्यास सक्षम आहे. करिता गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ चा अंतरीम खावटीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

६. मी अर्जदार व गैरअर्जदार यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

७. मी खालील प्रमाणे मुद्दे काढले असून त्यावरील माझे निष्कर्ष व कारणमिमांसा खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हिने मागणी केल्याप्रमाणे ती अंतरिम पोटगी/ खावटीसाठी पात्र आहेत काय? | अर्जदार हे गैरअर्जदार क्र. १ कडून दरमहा अर्जदार क्र. १ ला रु. ३,०००/- व अर्जदार क्र. २ व ३ ला प्रत्येकी रु. १,०००/- अंतरिम पोटगी/ खावटी मिळणेसाठी पात्र. |
| २. | काय आदेश? | **...अंतिम आदेशा प्रमाणे.** |

**: <u>का र ण मि मां सा</u> :**

**<u>मुद्दा क्र.१ बाबत</u>** :-

८. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ ची पत्नी आहे ही बाब वादातील नाही. अर्जदाराने विस्तृतपणे तिला झालेल्या कौटुंबिक छळाच्या घटनांचा उल्लेख अर्जामध्ये केलेला आहे. अर्जदार क्र. १ च्या अर्जावरुन प्रथम दर्शनी अर्जदाराला नाईलाजाने तिच्या माहेरी राहत असल्याचे दिसुन येत आहे. कारण कोणतीही स्त्री विनाकारण माहेरी राहणार नाही. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदाराच्या चरितार्थची कोणतीही व्यवस्था केल्याचे दिसून येत नाही. अर्जदार क्र. १ ही स्वतःचे उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे, असे कथन केले आहे. त्यामुळे या टप्प्यात अर्जदारांकडे उत्पन्नाचे साधन नाही असेच गृहीत धरावे लागेल. असे असतांना गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदाराला उदरनिर्वाहासाठी कुठलीही रक्कम दिलेली नाही. अशा परिस्थितीत गैरअर्जदार याची अर्जदारांच्या पालन पोषन करण्याची सर्वस्वी कायदेशिर व नैतीक जबाबदारी आहे जी गैरअर्जदार क्र. १ याने पार पाडलेली नाही. त्यामुळे अर्जदाराला अडीअडचणींना तोंड दयावे लागत आहे.

९. अर्जदार क्र. १ ने गैरअर्जदार क्र. १ चे बस स्टॅंडजवळ सायकलचे दुकान आहे. त्यातून त्याला दरमहा रु. ४०,०००/- इतके उत्पन्न मिळते. तसेच कळमेश्वर येथे गैरअर्जदार क्र. १ च्या नावावर दोन प्लॉट असून त्यातील घर त्याने

भाडयावर दिले आहे व त्यातून दरमहा रु. ५,०००/– भाडे येते असे कथन केले आहे. परंतु, अर्जदार क्र. १ ने गैरअर्जदार क्र. १ च्या व्यवसायाबाबतीत कोणतेही दस्त दाखल केलेले नाही. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ याला महिन्याला रु रु.४०,०००/– ते रु. ४५,०००/– मिळतात याबाबतचा पुरावा पटलावर उपलब्ध नाही. परंतु, हे एक कारण पोटगी नामंजूर करण्यासाठी पुरेसे नाही. आज रोजी अर्जदार क्र. १ ते ३ तिच्या भावाच्या घरी राहतात. ही बाब सुध्दा अंतरिम पोटगीच्या आदेशामध्ये अडसर करणारी असु शकत नाही. तसेच गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ ही शिलाईचे काम करीत असल्याचे कथन केले आहे. परंतु त्याबद्दल कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. गैरअर्जदार क्र. १ हा धडधाकट असून न्यायालयात हजर सुध्दा झालेला आहे. त्यामुळे तो काम करण्यास समक्ष आहे असा प्रथमदर्शनी निष्कर्ष नक्कीच काढता येईल. आजचे काळात एक मनुष्य किमान मजूरी करून दररोज रु. ४००/– ते रु. ५००/– रूपये कमावु शकतो. शिवाय गैरअर्जदार क्र. १ चांगला तरूण पुरुष आहे. ही बाब लक्षात घेता गैरअर्जदार क्र.१ चांगला कमावता व्यक्ती आहे असे नक्कीच म्हणता येईल. असे असतांना गैरअर्जदार क्र. १ अर्जदारांचा उदरनिर्वाह करण्यास नकार देत आहे. त्यामुळे प्रथम दर्शनी असे नक्कीच म्हणता येईल की, गैरअर्जदार क्र. १ याची सदरची कृती महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण अधिनियमचे अंतर्गत घरगुती हिंसाचारात मोडते. करिता प्रथम दर्शनी नक्कीच असे म्हणता येईल की, अर्जदार क्र. १ ते ३ हे गैरअर्जदार क्र. १ कडून अंतरिम पोटगी मिळणेसाठी पात्र आहे.

**१०.** या ठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे की, अंतरिम पोटगी निश्चित करताना गैरअर्जदाराचे उत्पन्न, अर्जदाराच्या जगण्याचे राहनीमान व कौटुंबिक दर्जाही लक्षात घेणे गरजेचे आहे. अर्जदार सद्य स्थितीला कळमेश्वर येथे राहत असल्याचे दिसुन येते. मोहपा सारख्या ठिकाणचे जीवनमान बघता अर्जदार क्र. १ हिला दरमहा रु. ३,०००/–(रुपये तीन हजार) व अर्जदार क्र. २ व ३ ला प्रत्येकी दरमहा रु. १,०००/– (रुपये एक हजार) पुरेसे वाटतात.

**<u>मुद्दा क्र.२ बाबत</u>** :-

**११.** अर्जदाराचे पालन पोषणाची नैतिक व कायदेशिर जबाबदारी ही गैरअर्जदार क्र. १ याची आहे. परंतु ती त्याने पार पाडलेली नाही, असे दिसून येत आहे. म्हणून मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**: आ दे श :**

**१.** अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

**२.** महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण अधिनियमाचे कलम २३ अंतर्गत असा आदेश देण्यात येतो की, गैरअर्जदार क्र. १ याने सदरचा अर्ज दाखल तारखेपासून (दि. ०९.०९.२०२४ पासून) अर्जदार क्र. १ हिला दरमहा रु. ३,०००/-(रुपये तीन हजार) व अर्जदार क्र. २ व ३ ला प्रत्येकी दरमहा रु. १,०००/- (रुपये एक हजार)याप्रमाणे या प्रकरणाचा अंतिम निकाल लागे पावेतो अंतरिम पोटगी द्यावी.

**३.** या आदेशाची प्रमाणीत प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना विनामूल्य पुरविण्यात यावी.

RAVINDRA RATHOD
Digitally signed by RAVINDRA RATHOD
Date: 2025.02.01 17:04:19 +0530

(आर. एल. राठोड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कळमेश्वर, नागपूर.

कळमेश्वर
दिनांक : २८.०१.२०२५

**<u>CERTIFICATE</u>**

I affirm that the contents of this PDF file order are same word to word, as per the original Order.

Name of the Stenographer :- R.M. Parmal (Gr. III)